# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

**Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट क्र. २६- २३ दिनांक :- २६/०१/२०२३

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने प्रजासत्ताक दिन साजरा.

दिनांक २६/०१/२०२३ रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहण करुन राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाप्रसंगी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त यांनी उपस्थित अधिकारी, अंमलदार तसेच नागरिक यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व हस्तांदोलन केले. मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील श्री. शशिकांत भगवानराव भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांना मा. पोलीस महासंचालक यांचेकडुन आंतरिक सुरक्षा अभियानामध्ये सलग दोन वर्ष व अधिक सेवा बजावल्याबद्दल आंतरिक सुरक्षा सेवा पदक मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते प्रदान करण्यात आले तसेच पोलीस उप निरिक्षक श्री. सुभाष भिमराव गोईलकर, विरार पोलीस ठाणे यांना केंद्र शासनाच्या गृह विभागाकडुन गुणवत्तापुर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने मा. पोलीस आयुक्त यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.



**मा. पोलीस आयुक्त राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देताना.**



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते, श्री. शशिकांत भगवानराव भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांना आंतरिक सुरक्षा सेवा पदक प्रदान झाल्याबाबत सत्कार करताना



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते श्री. सुभाष भिमराव गोईलकर, पोलीस उप निरिक्षक, विरार पोलीस ठाणे यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने त्यांचा सत्कार करताना.

-----ooo----